वागळे वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना / २९ /२०२६ दि. ३०/०१/२०२६

–:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

ज्याअर्थी, ठाणे शहरातील वागळे वाहतुक उपविभागाच्या हददीत **दिनांक ०६/०२/२०२६ रोजी पासुन ते दिनांक ०९/०२/२०२६ पर्यत उपवन तलाव या ठिकाणी संस्कृती युवा प्रतिष्ठान ट्रस्ट, समतानगर, वर्तकनगर, ठाणे पश्चिम यांच्या वतीने (उपवन) महोत्सव साजरा करण्यात येणार आहे.** सदर महोत्सवा करीता येऊर गेटकडून पायलादेवी मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर व पायलादेवी मंदिराकडून येऊरकडे येणाऱ्या रोडच्या दोन्ही बाजुस २०० स्टॉलस् (३X३ मिटर) लांबीचे स्टॉलस् रोडच्या कडेला उभारणार आहोत. सदर कार्यक्रमास मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने सदर ठिकाणीचा रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येणार असल्यामुळे वाहतुकीत बदल आवश्यक आहे. सदर परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चीत रहावी याकरीता, आम जनतेच्या सोयीसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

प्रवेश बंद	**१)** वर्तकनगर – शास्त्रीनगर – देवदयानगर – गांधीनगर, कापुरबावडी कडुन तसेच पवारनगर कडुन उपवन तलावाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बिरसामुंडा चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग	**अ)** वर्तकनगर – शास्त्रीनगर – देवदयानगर – गांधीनगर, कापुरबावडी कडुन तसेच पवारनगर कडुन उपवन तलावाकडे जाणाऱ्या वाहनांना बिरसामुंडा चौक येथुन उजवीकडे वळुन पवारनगरकडे जाणाऱ्या रोडने द केव ट्रक बाजुस असलेल्या AESSEN PVT LTD GATE NO 18 येथुन डावीकडे वळुन सरळ पुढे इच्छित स्थळी जातील.
पर्यायी मार्ग	**ब)** गांधीनगर – कापुरबावडी व पवारनगर कडुन उपवन तलाव मार्गे येऊरकडे जाणारी सर्व वाहने ही बिरसामुंडा चौकातुन डावीकडे वळुन सरळ जावुन देवदयानगर चौकातुन उजवीकडे वळुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद	**२)** गावंडबाग परीसरातील सर्व्र सोसायटी व कोकणीपाडा नं.१, उपवन, ठाणे पश्चिम येथील सर्व प्रकारच्या वाहनांना लोटस सोसायटी, मेन गेट समोरील गावंड बाग येथील **सार्वजनिक शौचालय ठामपा** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग	गावंडबाग परीसरातील सर्व सोसायटी व कोकणीपाडा नं.१ येथील सर्व प्रकारची वाहतूक ही निलगिरी सोसायटी, कॉर्नर आशापुरा – नवजिवन मेडीकल येथुन डावीकडे वळुन पुढे गावंड बंगला – सुर्या सोसायटी – गुलमोहर सोसायटी, द केव ट्रक बाजुस असलेल्या AESSEN PVT LTD GATE NO- 18 येथुन पवारनगर रोडवरुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद	**३)** येऊर गेट कडुन उपवन पयलादेवी मंदिराकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **येऊर गेट** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग	येऊर गेट कडुन उपवन तलावाकडे जाणारी वाहने ही शिवाईनगर – देवदयानगर कट येथुन डावीकडे वळुन निळकंठ सोसायटी – बिरसामुंडा चौक येथुन इच्छित स्थळी जातील.
नो पार्कींग	**१)** येऊर गेट ते शिवाईनगर चौक पर्यत रोडच्या दोनही बाजुस " **नो पार्किंग** " करण्यात येत आहे.
नो पार्कींग	**२)** पयलादेवी मंदिर ते बिरसामुंडा चौक पर्यत रोडच्या दोन्ही बाजुस " **नो पार्किंग** " करण्यात येत आहे.
नो पार्कींग	**३)** उपवन येथील लोटस सोसायटी मेन गेट ते आशापुरा – नवजिवन मेडीकल पर्यत रोडच्या दोन्ही बाजुस " **नो पार्किंग** " करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना हि **दि. ०६/०२/२०२६ रोजी ते दि. ०९/०२/२०२५ रोजी दुपारी १४:०० ते रात्रौ ००:०० वा.** पावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा.जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी,

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, परिवहन उपक्रम ठाणे महानगरपालिका, ठाणे व बृहन्मुंबई मनपा (बीईएसटी)

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १, ठाणे व परिमंडळ – ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ ठाणे वाहतूक उपविभाग.

प्रभारी अधिकारी, वागळे इस्टेट/नौपाडा वाहतूक उपविभाग.

२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.